Vol 6 Issue 10 April 2017 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 10 | APRIL - 2017

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

# कल्पना दुधाळ यांची कविता : स्त्री व्यथेचा हुंकार

प्रा. राणी शेंडकर
मु. सा. काकडे महाविद्यालय,सोमेश्वरनगर,बारामती, पुणे.

## प्रस्तावना




अनेक प्रतिभावान ग्रामीण लेखिका–कवयित्रींनी सकस ग्रामीण साहित्याची निर्मिती करून ग्रामीण साहित्यात फार मोठे योगदान दिले आहे. पुरुषांच्या तुलनेत लेखन करणाऱ्या कवयित्री संख्येने कमी असल्या तरी त्यांचे साहित्य मनाला भुरळ घालणारे आहे. ग्रामीण जीवनाचे सुख दुःख, आशा आकांक्षा, स्वप्न, ग्रामीण जीवनाचे प्रश्न याचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत पहायला मिळते. कविता हा अत्यंत संवेदनशील वाङ्मय प्रकार. अंतर्मनातला आवाज अगदी सहजपणे त्यात व्यक्त होत असतो. ग्रामीण महिलांची कविता ही या संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरण आहे.

ग्रामीण कवितांचा अभ्यास करताना ठळकपणे नाव समोर येते ते बहीणाबाई चौधरींचे. एका अशिक्षित, अडाणी स्त्रीने आपल्या प्रतिभा, संवेदना, निरीक्षण या जोरावर अप्रतिम काव्यनिर्मिती केली. सावित्रीबाई फुले यांच्या कविता प्रबोधनात्मक आहेत. अलिकडच्या काळातील प्रतिमा इंगोले, अनुराधा गुरव, सरोजीना बाबर, अनुराधा पाटील, ललिता गादगे, कांता भोसले अशा अनेक कचयित्रींनी ग्रामीण कविता समृद्ध केल्याचे दिसून येते. या कवयित्रींच्या फळीत नव्याने आवर्जून नामोल्लेख करावा वाटतो तो कवयित्री कल्पना दुधाळ यांचा. 'सीझर कर म्हणतेय माती' आणि 'धग असतेच आसपास' या दोनच कवितासंग्रहाने त्या महाराष्ट्रभर पोचल्या. वर्तमान ग्रामजीवनाशी व कृषीसंस्कृतीशी नाते सांगणाऱ्या तसेच निसर्गाच्या जवळ जाणाऱ्या त्यांच्या कविता आहेत. बदलती खेडी, बदलत्या कृषी जाणीवा त्यांच्या कवितांमधून व्यक्त होतात. जागतिकीकरणाचे संदर्भ आणि त्यामुळे उध्वस्त होत चाललेला शेतकरी कवितांमध्ये येतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या कविता स्त्री–जाणीवा व्यक्त होताना दिसतात. स्त्रीच्या दुःखाचे अत्यंत बारकावे त्यांनी कवितांमधून टीपलेले आहेत. तिच्या मनाची उलथापालथ त्यांनी व्यक्त केली आहे. माणूस असूनही दुय्यम जगणाऱ्या पण सोशीक असलेल्या बाईचे जगणे ते मांडतात.

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील बोरी–भडक या छोट्या गावात त्या राहणाऱ्या आहेत. गावात राहून शेतात कष्ट करत त्यांची कविता फुलताना, बहरताना दिसून येते. तत्पूर्वी टेंभुर्णी या माहेरीही त्यांची पार्श्वभूमी शेतकऱ्याचीच आहे. त्यामुळे शेतकरी महिलेचा वारसा त्या कवितेतून समर्थपणे व्यक्त होतो. त्यांची कविता ही समस्त शेतकरी जो दिवस रात्र रानात राबतो, काबाडकष्ट करतो, त्यांच्या दुःखांना वाचा फोडताना दिसते. ग्रामीण स्त्रीचं जगणं, भोगणं, सोसणं हा त्यांच्या स्त्रीविषयक कवितांचा गाभा असलेला दिसतो.

खोदणारे दमून गेले
तोडकऱ्यांचे हात तुटले
मायबाई सगळ्या क्षमता आजमावून बघ
खरी सौंदड तू आहेस की मी?

ग्रामीण स्त्रीला सौंदडाच्या झाडाची उपमा कवयित्री देताना दिसते. खडतर परिस्थितीत तग धरून राहणे, मुळाशी पाणी साठवून ठेवणे, पाषाणाशी टक्कर देणे, औषधी गुणधर्म असणं, खरबूडी साल असणं ही सौंदडेची वैशिष्ट्ये आहेत. तशीच असते ग्रामीण स्त्री असे कवयित्रीला सांगायचे आहे. ही कविता व्यथा मांडणारी आहे की, आशावाद व्यक्त करणारी असा प्रश्न पडेलही परंतु व्यथा मांडते हे नक्की.

बाईच्या जगण्याची खडतरता मांडताना कवयित्री म्हणते

माझं जगणं जळतं
होऊनिया सरपण
जन्म बाईचा गं सये
बोरी – बाभळीचं बन

बाप, भाऊ अन नवरा यांच्याकडून उपेक्षेचं जगणं जगणारी एक बाई असहय, दुबळी बनते. या दुबळ्य सुनेला छळ करून मारले जाते. बाई संपते

पण तिचे मारेकरी उघड माथ्याने निर्लज्जपणे समाजात वावरताना दिसतो. याचं दुःख कवयित्रीने वरील कवितेत मांडले आहे.

कवयित्रीने बाईची व्यथा मांडताना बाईला कधी सौंदडीची, कधी बोरी–बाभळीची तर कधी गाईची उपमा दिली आहे. 'बाय आणि गाय' या कवितेत बाई आणि गाईचे समदुःखी चित्रण करताना कवयित्री म्हणते

बाई गं... तू काय नि मी काय
जन्मभर दावणीला बांधलेलो...
शरीरातून शरीर बाहेर पडलं
आणि रुजण्याची माती नापीक झाली, की
पडिकात कुणी फिरकत नाही...

दावणीला बांधलेली मुकी गाय, मर्यादीत स्वातंत्र्यात वावरणारी. तशी बाई. केवळ भोगवस्तू. तिची गरज संपली की तिची परवड चालू. तसंच गाईचंही जगणं. वेत संपलं की दूध देणं बंद. मग ती बिनकामाची खाटी म्हणून कसायाला विकली जाते. जमीनीचं तसंच. गरज संपली की उचलून फेकणं हा स्वार्थी व्यवहार जनावराप्रमाणेच स्त्रीबरोबर तिला जनावर माणूनच केला जातो हे कवितेतून मांडले गेले आहे.

समाजात वाढत चाललेल्या पशुवृत्तीचे दर्शनही तिच्या कवितेतून आढळते. ती म्हणते,

उलट्या मिरच्यांचचं झाड...
उलट्या पिसाच्या कोंबड्या...
तशी उलट्या काळजाची माणसं
वावरताहेत जिकडं तिकडं...दिवसाढवळ्या
स्त्रीत्वाचा बळी घेत.

दररोज वृत्तपत्रात स्त्री अत्याचाराच्या बातम्या वाचायला मिळतात. कुठलीही गावे, शहरे यापासून लांब नाहीत. रात्रीचे झालेले निर्भया प्रकरण आणि दिवसाढवळ्या झालेले कोपर्डी प्रकरण अनेक ठिकाणी घडत आहे. पुरुषातील पाशवी प्रवृत्तीचे प्रतिंबिक कवयित्रीच्या संवेदनशील मनाने वरील पंक्तीत टीपलेले दिसते. बाई ही भोगवस्तू आहे हे भयाण वास्तव ती मांडते.

संस्कृतीबद्दलही तिचे काही प्रश्न आहेत. शनिदर्शनाचा किंवा मंदिरप्रवेषाचा जो वाद अलिकडे निर्माण झाला आहे. तो कवयित्रीने आधीच मांडला आहे. गाभाऱ्यात प्रवेष नसतानाही खेड्यातली मुलगी देवासाठी फुलं गोळा करते. ती म्हणते,

गाभाऱ्यात प्रवेश नाही
हे माहीत असूनही
कुठल्याशा देवाला आवडतो म्हणून
रुईच्या पानाफुलांच्या हारासाठी
रानोमाळ भटकले आहे मी...

'लय शिकला आणि वाया गेला' अशी खेड्यात म्हण आहे. ही म्हण व्यक्त करणारी 'सायेब' ही कविताही मन हेलावून टाकणारी आहे. शिकलेला मुलगा शहरात जाऊन बायकापोरात, भौतिक सुखात रमलेला असतो. सायेब झालेला असतो. आईला, गावाला पूर्ण विसरतो. आईबापानं सालानी राहून त्याला शिकविलेलं असतं. आर्ततेने आई म्हणते,

सायेब झालास पोरा तू
खीनभर घरला येऊन ला
तुटायला झालंय दावं आता
तोंड तरी दावून जा...

पंख फुटलेली मुलं ठेंगा दाखवतात आणि आईवडिलांना पारखी होतात. ही पोरं अग्नीसंस्कारालाही येऊ नये हे शिक्षणव्यवस्थेचं अपयश कवितेतून दिसते. एकट्या उरलेल्या, गावाकडं शेवटचे दिसव मोजणाऱ्या बाईचे हे दुःख आहे.

लाडात वाढलेली मुलगी जेव्हा सगळी नाती एका फटकाऱ्यात तोडून जाते तेव्हा तिच्या आईवी व्यक्त होणारी घुसमट 'शब्दानं न बोलता' या कवितेतून कवयित्रीने व्यक्त केली आहे. पोटची मुलगी एका शब्दाने न बोलता झुगारून जाण्यानंतर आईचे झुरणे कवयित्रीने अत्यंत नेमकेपणाने मांडले आहे. जाण्याबद्दल तक्रार कमी पण न सांगण्याबद्दल जास्त असते. स्त्रीचं सोशीक जगणं 'अंश' तसेच 'सौंदड' अशा कवितांमधून प्रकटतं. काळाच्या अनेक घड्या बदलत गेल्या तरी स्त्रीचं जगणं सुसह्य झालं नाही. अगदी सीतेपासून आजपर्यंत प्रत्येक घडीतून जाताना बाईला परीक्षा द्यावीच लागली आहे. पाट्यावर वाटण वाटून तिनं सगळ्यांना कालवण केलं अन स्वतः मात्र पाटा धुतलेल्या पाण्यात भाकरी चुरून खाल्ली. काहीही तक्रार न करता. अशा स्त्रीची सोशीक व्यथा कवयित्रीने आपल्या अनेक कवितांमधून मांडली आहे. ग्रामीण स्त्री–दुःखाचे सूक्ष्म–अतिसूक्ष्म धागे उलगडण्याचे तिचे कौशल्य दिसून येते. 'तिच्या बालिश अल्लड हसण्यावरून नवऱ्यानं डोक्यात काचेची बाटली फोडली तेव्हापासून ती हसणंच विसरली' हा नवविवाहीतेचा भयानक अनुभव तीने कवितेत मांडला आहे. 'दिल्या घरी' कवितेतून ती बाईचा समजूतदारपणा मांडते. ती म्हणते,

दिल्या घरी सुखी राहण्याचा
आशिर्वाद घेऊन आल्यावर
वघळीतनं वाहता वाहता
खरबुडे खडे, चिपारीनं गुळगुळीत व्हावं
तसा सोडला अंगाचा कारीपणा

दारातली ढीगभर खेटरं सांभाळत
समजूतदारपण दाखवला...

हा समजूतदारपणा इतका टोकाचा आहे की ती तक्रार करत नाही. गुमान सोसत राहते. आहे ते जगणे सुंदर मानते. एका कवितेत कवयित्री म्हणते,

बाई गं! एवढं जगणं, भोगणं, सोसणं
शिकलीस कुठून?
तरीही हे जगणं
किती सुंदर वाटतंय गं!

तिच्या आनंद शोधण्याच्या जागाही छोट्या छोट्या आहेत. हंड्यावर हंडे आणताना नवरा आडवा येतो आणि रातीला पाय दाबीन म्हणतो तेव्हा तिच्या गाली हसून सुख सांडते. सरीच्या वाफ्यात कांदे लावताना ती जीव लावते. काळ्या आईला हिरवं गोंदते आणि मातीत नांदते. फुलं तोडत नाही देह तोडते. बेणं नाही तर मन दाबते. स्वतःला काम करत करत सांधते. सोबत संसारही कांड्या कांड्यांनी सांधते. सायाळाचं काटं टचाटचा टोचत असताना हातभर संसाराचं चितार गोंदत असते. आईबापावर ग्रामीण स्त्रीची कमालीची श्रद्धा असते. तीचा आशावाद आणि संयमही मोठा असतो. रिकाम्या ओंजळीतही भुईकमळं फुलतील असा विश्वास तिला असतो.

कल्पना दुधाळ यांना स्त्री–दुःखाची नेमकी जाण आहे. स्त्रीची वेदना, कोंडी त्यांना माहीत आहे. तिचे ताणतणाव माहीत आहेत. दुःखाला आक्रमकपणे न मांडता समजूतदारपणे त्यांची स्त्री व्यक्त होते. दुःख हुबेहुब समोर उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेत आहे. बाईच्या दुःखाला वाचा फोडणारी ती कवयित्री आहे. अस्सल वास्तवतेची जोड तिच्या कवितेला आहे. कुठेही कृत्रिमतेची झालर नाही. स्वप्नरंजनात ती जगणारी नाही. नक्कीच त्यांची कविता वाचकाला आत–बाहेर हलवून टाकते. अस्वस्थ करते. म्हणूनच कल्पना दुधाळ यांच्या रूपाने मराठी साहित्यविश्वाला एक दर्जेदार कवयित्री मिळाली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांची कविता ग्रामीण महिलांचा कवितेला नवा आयाम मिळवून देईल असा विश्वास वाटतो.

### *संदर्भग्रंथ यादी–*

1)ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध – डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, मेहता पब्लिषिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी 1985.
2)ललित, ऑक्टोबर 2016, अंक दहावा, स्वगत – कल्पना दुधाळ
3)ग्रामीण लेखिकांचे साहित्य, स्वरूप, विकास आणि दिशा, संपादक : प्रा. डॉ. जया कदम, शब्दवैभव प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी 2017.

### *साधनग्रंथ सूची –*

1) सिझर कर म्हणतेय माती, कल्पना दुधाळ, नवसिद्धांत प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, डिसेंबर 2010.
2) धग असतेच आसपास, कल्पना दुधाळ, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, जून 2016

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org